आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका
विद्यावार्ता™

The New Miraj Education Society's

# Kanya Mahavidyalaya, Miraj

**One Day National Multidisciplinary National Seminar**
**On**

# Emerging Trends and Issues in Social Sciences

**Saturday, 1st February, 2020**

## *Organized by*

Department of Economics, Geography, History, Political Sciene, Psychology, Sociology and Physical Education & Sports

**Editor**
**Prof. Babasaheb Sargar**

**Co-editor**
**Prof. Ramesh Kattimani**

**Volume II**

## INDEX

| Sr. No. | Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Mr. Amar Raju Jadhav<br>Mr. Sanjay Maruti Patil | An Analytical Study Of Problems And Issues Of Labours In Kolhapur City | 13 |
| 2 | Dr. Sunita Hansraj Ambawade | Role Of Ict In Social Science Research | 17 |
| 3 | Mrs. Varsha Raghunath Shinde | Advantages And Disadvantages Of Social Media For Society | 20 |
| 4 | Dr. Sheikh Rashida Begum Rahematulla | Role Of Sports In Society | 24 |
| 5 | Mr. Abhijeet Sadashiv Kharade | A Brief Review On History And Skills Of Volley Ball | 28 |
| 6 | Mr. Birajdar Vijaykumar Govindrao | Recent Trends in social Science Research | 32 |
| 7 | Mr. Akhilesh V.Shinde | Clean Village Campaign and Environmental Awareness in Maharashtra | 39 |
| 8 | प्रा.डॉ.टी.के. उदगीरकर<br>श्री.अभिषेक लक्ष्मण सुतार<br>श्री.अखिलेश शिवाजी गुरव | भारतातील पीक विमा योजनेची प्रगती व आव्हाने | 42 |
| 9 | प्रा. सौ. डॉ. मंगल भास्कर माळगे | आर्थिक मंदी : भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक आव्हान | 46 |
| 10 | प्रेरणा दिलीप दीक्षित | २१ व्या शतकातील स्त्रीवादी चळवळी | 48 |
| 11 | प्रा. डॉ. ममता कार्तिक कन्नाडे<br>प्रा.डॉ. शैलजा कालिदास माने | कोल्हापूर शहरातील गृहणीच्या सामाजिक दर्जाचा समाजशास्त्रीय अभ्यास: विशेष संदर्भ सदर बाजार आणि ताराबाई पार्क प्रभाग | 52 |
| 12 | श्रीमती गावडे स्वाती आप्पासो | सेंद्रिय शेती काळाची गरज | 56 |
| 13 | डॉ. चन्ने विद्या पी. | भारतीय कृषी पुरक इतर व्यवसाय आणि स्त्री उद्योजिका | 60 |
| 14 | डॉ. गौतम खु. कांबळे | श्रम अर्थशास्त्राचे वर्तमान स्वरुप : विश्लेषण | 65 |
| 15 | कु. राणी महादेव कांबळे | सांगली जिल्हयातील स्त्री कामगांराचे कृषीक्षेत्रातील योगदान | 69 |
| 16 | श्री. प्रसाद पांडुरंग दावणे | दारिद्रय रेषा निश्चिती संदर्भात सुरेश तेंडुलकर आणि सी. रंगराजन समितीची तुलनात्मक अभ्यास | 73 |
| 17 | प्रा. डॉ. उल्हास महादेव माळकर | दुग्ध उत्पादन, प्रक्रिया व विक्री संस्था : व्यष्टि आर्थिक अभ्यास | 77 |
| 18 | प्रा. डॉ. विजयकुमार सुरेंद्र विनोदकर | आधुनिकीकरणाचा मानवाच्या आरोग्यावर व आर्थिक विकासावर झालेला परिणाम | 80 |

# कोल्हापूर शहरातील गृहणीच्या सामाजिक दर्जाचा समाजशास्त्रीय अभ्यास: विशेष संदर्भ सदर बाजार आणि ताराबाई पार्क प्रभाग

**प्रा. डॉ. ममता कार्तिक कन्नाडे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

**प्रा.डॉ. शैलजा कालिदास माने**
समाजशास्त्र विभागप्रमुख
एल बी एस. ऑफ आर्ट्‌स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, सातारा

**प्रस्तावना :**

स्त्री ही आई, बहीण, पत्नीची भूमिका पार पाडत कुटुंबाची जबाबदारीही समर्थपणे पेलत असते. स्त्री म्हणजे कुटुंबाचा कणा असते, तिच्या अस्तित्वावरच कुटुंबाचे भवितव्य अवलंबून असते. म्हणूनच कुटूंबात आणि एकंदर समाजात स्त्रियांचे स्थान फार महत्वाचे असते. स्त्री आणि पुरूष समाज रथाची दोन चाके असतात आणि ही दोन चाके समाज असली तरच समाज चालू शकतो तसेच जेथे स्त्रियांना सन्मानाने वागवले जाते तेथे देवतांचा वास असता. म्हणजेच ते कुटुंब आणि समाजही समाधानी असतो.

आपल्या भारतीय व्यवस्थेला सुमारे पाच हजार वर्षाचा इतिहास आहे. वैदिक काळात स्त्रीयांचा सामाजिक दर्जा जितका पुरूषांच्या बरोबरीने समान होता तितका तो त्यानंतर कधीही नव्हता पुरूषप्रधान व्यवस्थेने स्त्रियांपेक्षा पुरूषांना श्रेष्ठ ठरवून त्यांना अनेक हक्क बहाल केले आहेत. कलम १४ ते १८ नुसार सर्वांना समानतेचा हक्क बहाल करण्यात आला आहे. तो हक्क शहरातील गृहीणीला उपभोगता येतो का हे जाणून घेण्यासाठी वरील विषयाची निवड करण्यात आली आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

१. कायद्याने व राज्यघटनेने सर्वानाच समान हक्क दिले आहेत ते प्रत्यक्षात गृहीणीला मिळातात का याचा अभ्यास करणे.
२. ग्रृहीणीचा कुटुंबातील व समाजातील स्थान अभ्यासणे

**संशोधन पध्दती :**

प्रस्तूत संशोधनासाठी संशोधिकेने प्राथमिक स्त्रोताचा (प्रश्नावली व निरीक्षण) वापर केला आहे आणि दोन्ही प्रभागातून प्रत्येकी पाच स्त्रियांकडून प्रश्नावली भरूण घेतलेली आहे.

मनुने 'मनुस्मृती' या ग्रथांची रचना केली. एकीकडे त्यांने स्त्रीयांना माता, भगिणी व पत्नी या भूमिकेतून सन्मान दिला तर दुसरीकडे तिला 'अबला' घोषीत केले. स्त्रीने प्ररूषाची गुलाम म्हणून जगले पाहिजे तिला कोणतेही स्वातंत्र्य नाही अशी भूमीका त्यांनी घेतली. विवाहापूर्वी वडिलांनी, विवाहानंतर पतीने व वृध्दापकाळी पुत्राने ताब्यत ठेवावे स्त्रियांना स्वातंत्र्य नाही असेही म्हटलेले आहे. या कालखंडापासून स्त्रीयांना समाजात दुय्यम स्थान प्राप्त झाले.

२१ व्या शतकात स्त्रीने स्वत:ची शक्ती ओळखली आहे. पण वास्तवात कोल्हापूर शहरातील गृहणीचा दर्जा कसा आहे हे अभ्यासण्यासाठी कोल्हापूर शहरातील झोपडपट्टीचा भाग (सदर बाजार) आणि उच्चभ्रू समजला जाणारा भाग (ताराबाई पार्क) या दोन भिन्न असणा—या भागात गृहीणीचा सामाजिक दर्जा अभ्यासण्यासाठी प्रश्नावली भरूण घेण्यात आली. त्यातील महत्वाच्या प्रश्नाचे विश्लेषण खालीलप्रमाणे :